02-07-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 7/1/2025 10:48 PM Page 1



# ऍसिड फेक प्रकरणाशी एकतर्फी प्रेमाचा विळखा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १ :** ३० रोजी धारगळ येथील एका अल्पवयीन कॉलेज कुमारावर ऍसिड फेकण्याचा जो प्रकार निलेश देसाई कळणे दोडामार्ग सिंधुदुर्ग महाराष्ट्र या भागातील नागरिकांनी केला होता. तो प्रकार एकतर्फी प्रेमातून झाल्याचा दावा आता जखमी असलेले मुलाचे वडील उमेश शेट्ये यांनी केला.

संशयित निलेश देसाई वय ४६ वर्षे हे करासवाडा औद्योगिक वसाहतीत एका गार्डन मध्ये कामाला होते. तिथूनच त्याने पाच लिटरचा ऍसड कॅन चोरून आणला होता. त्याने रासायनिक द्रव करासवाडा येथील औद्योगिक वसाहतीतील एका काच उत्पादन कंपनीतून पाच लिटर ऍसिड कॅन चोरून आणला होता. गेल्या आठ दिवसापासून गार्डनर म्हणून तो त्या ठिकाणी काम करत होता.

संशयित निलेश देसाई यांच्या शरीरावर ऍसिडचे निशान शोधण्यासाठी वैद्यकीय तपासणी करण्यात आली. संशयीताचे हेल्मेट आणि रेनकोट सह ऍक्टिवा स्कूटर पोलिसांनी जप्त केली. ऍक्टिवा

## संशयित निलेश देसाई यांना दोन दिवसाची पोलीस कोठडी

स्कूटरवर ऍसिड रासायनिक निशान आढळल्याने त्या स्कूटरची ठसे तज्ञांनी तपासणी केली होती. चोरी झालेल्या सिड कॅनवर म्हापसा पोलीस ठाण्यात त्यांच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला. १ रोजी त्याला न्यायालयासमोर हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली. संशयीताला तीन रोजी सकाळी दहा वाजता बाल न्यायालयात हजर करण्याचे आदेश देण्यात आले. संशयीताच्या विरोधात १२४ (१) १०९ आणि गोवा बाल कायद्याच्या कलम ८/ २ मध्ये गुन्हा नोंदवण्यात आला होता.

संशयीत निलेश देसाई यांची मुलगी व जखमी अवस्थेत असलेला मुलगा हे दोघेही म्हापसा उच्च माध्यमिक विद्यालयात एकत्रितपणे शिक्षण घेत होते .तिथेच त्यांची मैत्री जुळली. मुलगीने अनेक वेळा जखमी



मुलाला वेगवेगळे एसएमए पाठवण्यात आले. मुलाचा मुलीने पाठलाग करून घरापर्यंत पोचली. त्यावेळी जखमी मुलाच्या आईने तिची चौकशी केली असता त्या मुलीने आपण याच्यावर प्रेम करते असं स्पष्टपणे सांगितलं. परंतु मुलाने आपण हिच्यावर प्रेम करत नाही. ती एकतर्फी प्रेम करते. असे स्पष्ट केले. आणि आई वडिलांनी त्या मुलीची समजूत काढून त्याला घरी पाठवून दिलं. परंतु अधून मधून रात्री अपरात्री मुलगी मुलाला मोबाईल द्वारे वेगवेगळे एसएमएस पाठवून धमकी देत होती. आपण जीव संपवणार ,आपण विष घेणार, असे वेगवेगळे एसएमएस पाठवत होती. आणि त्याच अनुषंगाने ती मुलगी गोवा मेडिकल मध्ये ऍडमिट झाली होती. ती ऍडमिट झाल्याची माहिती तिची मावशी जी मावशी ओल्ड गोवा पोलीस स्टेशन मध्ये कामाला आहे. तिने आपल्याला माहिती दिली. अशी माहिती जखमी मुलाचे वडील उमेश शेट्ये यांनी दिली. त्या मुलीची आम्ही बांबोळी हॉस्पिटल मध्ये जाऊन पाहणी केली, असता ती बोलण्याच्या मनस्थितीत नव्हती. त्याच वेळी संशयित निलेश देसाई यांनी आम्हाला तुम्ही घाबरू नका, तुमची काही चूक नाही. असे सांगितले होते. त्यानंतर आठ दिवसाने त्या मुलीचा अंत झाला. त्याच वेळी संशयित आणि संशयीताच्या मावशीने सिंधुदुर्ग पोलीस स्टेशनवर आमच्या विरोधात गुन्हा नोंदवला. आणि ती तक्रार मोपा पोलीस स्टेशनवर देण्यात आली. आम्ही पोलिसांना सर्व प्रकारचे जे पूर्वीचे एसएमएस कशा प्रकारची धमकी, मागील कशा प्रकारचे धमकी वजा एसएमएस संदेश, आम्हाला येत होते. त्याचे सर्व पुरावे आम्ही पोलिसांना सादर केले आहे .आपल्या मुलाचा बदला घेण्यासाठी संशयित आणि वेगळाच कटकारस्थान रचल्याचा दावा शेट्ये यांनी करून या प्रकरणात आणखी कुणाचा तरी हात असेल असा दावाही यावेळी शेट्ये यांनी करून तिची मावशीचा या तक्रारीत हात आहे असे म्हटले.

संशयीताची मुलगी तिला जॉन्डिस आजार असल्यामुळे त्यातच तिचा मृत्यू झाला आहे. असा दावा आणि अहवालही हॉस्पिटल मधून पोलिसांना सादर केल्याचा दावा शेट्ये यांनी केला. त्यामुळे तिच्या मृत्यूची आमचा काहीही संबंध नाही असे स्पष्ट केले.

संशयित आणि पी प्लॅन करून आपल्या मुलाला संपवण्याचा जो कट रचलला आहे. तो निंदनीय आहे,पेडणे पोलिस निरीक्षक सचिन लोकरे पुढील तपास करीत आहे.

पान १ वरून

## सुर्ला पठारावरील रिसॉर्ट प्रकल्पाला उच्च न्यायालयाची नोटीस

२४ जुलै २०२३ रोजी उच्च न्यायालयाने राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या शिफारशीनुसार, म्हादई अभयारण्याला व्याघ्र अभयारण्य घोषित करण्याचे आदेश दिले होते. मात्र, याचे पालन झाले नसल्याने आणि त्याच भागात रिसॉर्टसाठी जागा उपलब्ध करून दिल्यामुळे पर्यावरणीय कायद्यांची पायमल्ली झाली आहे, असा दावा करण्यात आला आहे.

प्रस्तावित रिसॉर्ट प्रकल्पाचा परिसर वाघ, स्लॉथ अस्वल, बिबट्या, पँगोलिन, विविध सर्प प्रजाती आणि ३०० पेक्षा अधिक दुर्मीळ वनस्पतींसाठी प्रसिद्ध असून तो अत्यंत संवेदनशील जैवविविधतेचा भाग मानला जातो. या भागात बांधकाम करून संरचना आणि विद्युत कुंपण घालण्याचा सुमारे ८ कोटी रुपयांचा प्रकल्प वन्यजीवांना प्रत्यक्षात दूर ठेवण्याचे उद्दिष्ट गाठतो, ज्यामुळे संवर्धनाऐवजी व्यावसायिक लाभांना प्राधान्य दिल्याचा आरोप याचिकेत केला आहे.

रिसॉर्ट प्रकल्प वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ मधील कलम २९ तसेच वन संरक्षण कायदा, १९८० च्या तरतुदींनाही सर्रासपणे धुडकावून देतो, असा ठपका याचिकेत ठेवण्यात आला आहे. या कायद्यांनुसार, अभयारण्यात कोणतीही बांधकामे वा व्यावसायिक उपक्रम राबवण्यासाठी केंद्र सरकारची पूर्वमान्यता आवश्यक आहे.

न्यायालयाने सरकार, वन आणि पर्यावरण मंत्रालय यांना उत्तर देण्यासाठी वेळ दिला असून यावर पुढील सुनावणी दरम्यान युक्तिवाद होणार आहे.

दरम्यान, याचिकाकर्त्यांनी राज्य सरकारविरोधात अवमान कारवाईची मागणीही केली आहे.



## जनशक्ती वेल्फेर असोसिएशन तर्फे वनमहोत्सव साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १ :** जनशक्ती वेल्फेर असोसिएशन, केळबाय कुर्टी फोंडा संस्थेतर्फे रविवारी २९ जून रोजी वनमहोत्सव भाग २ हा उपक्रम राबविण्यात आला. सदर उपक्रम केळबाय कुर्टी फोंडा गावच्या एका डोंगरावर आयोजित करण्यात आला होता. फर्मागुढी फोंडा येथील पी. इ. एस. रवी सिताराम नाईक महाविद्यालयातील प्राणीशास्त्र, जीवशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, रसायनशास्त्र शिकणारे विद्यार्थी व संस्थेचे सभासद या उपक्रमात सहभागी झाले. सहाय्यक प्राध्यापक डॉ. कीरण गावडे यांनी महाविद्यालयातील मुलांना मार्गदर्शन केले. त्यांनी वेगळ्यावेगळ्या झाडांची, पक्षांची व एकंदर पर्यावरण विषयी माहिती सर्वांना दिली. तसेच सभासद कृष्णा गावडे यांनी मार्गदर्शन केले. संस्थेतर्फे २५ दिवस अगोदर जागतिक पर्यावरण दिवस कार्यक्रमा निमित्ताने लावलेल्या झाडांच्या बाजूला सफाई केली व त्या झाडांच्या मुळात माती टाकण्यात आली. त्याचबरोबर अननसांची नवीन झाडे या डोंगरावर लावण्यात आली. जनशक्ती वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष विशांत गावडे, इतर पदाधिकारी तसेच महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक श्वेता सांगावकर उपस्थित होत्या.

## दुर्वांकुर संस्थेच्या ऐतिहासिक गड किल्ल्यांना भेटी



■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १ :** येथील कला, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या दूर्वांकुर कला केंद्र संस्थेने कोल्हापूर, सातारा व रायगड जिल्यातील ऐतिहासिक गड, किल्ल्यांना भेटी देत एक अनोखा उपक्रम राबविला. तीन दिवसीय उपक्रमात संस्थेचे १५ सदस्य सहभागी झाले होते.

या उपक्रमात पन्हाळा, विशाळगड, पावन खिंड, सज्जन गड, प्रतापगड, रायगड या किल्ल्यांना भेटी दिल्या व माहितीगार व्यक्तींकडून संपूर्ण इतिहास जाणून घेतला. यावेळी रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्य समाधीसाठी बसून आठवावे शिवरायांचे रूप, मनोमन साठवून घेत स्मरण केले. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा आवडता कुत्रा वाघ्याचा पुतळा व कर्तबगार कामगिरीचा मागोवा घेतला. यावेळी या मार्गातील

श्री बाळूमामा, श्री खंडोबा मंदिर आदींना भेटी देऊन सदस्यांनी योग्य भक्तिभाव साधला. महाबळेश्वर या पर्यटन स्थळी भेट दिली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष चंद्रहास दाभोलकर, उपाध्यक्ष प्रकाश नाईक, सचिव अर्जुन गडेकर, खजिनदार संजय नाईक, सदस्य रामचंद्र केरकर, अशोक हरमलकर, दत्ताराम ठाकूर, संजय नाईक, सज्जन नाईक, भरत वस्त, विजय बर्डे, गोविंद परब, गुरुदास नानोस्कर, श्रीकांत कान्होजी, रूपेश मांद्रेकर आदींनी सहभाग घेतला होता.

## बांदा –पानवळ येथे दोन एसटी गाड्यांची समोरासमोर धडक

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि. १ :** बांदा – दोडामार्ग राज्यमार्गावर पानवळ येथे दोन एसटी बसमध्ये समोरासमोर धडक बसून झालेल्या अपघातात दोन्ही बसमधील १७ प्रवासी जखमी झाले. दोन्ही बसचे चालक व वाहक ही अपघातात जखमी झाले. या घटनेने बांदा परिसरात एकच खळबळ उडाली. अपघातात दोन्ही बसचे नुकसान झाले असून सुदैवानेच मोठा अनर्थ टळला आहे. हा अपघात सोमवारी सकाळी ६.४५ वाजण्याच्या सुमारास घडला.

याबाबत अधिक माहिती अशी की, बांदा फुकेरी बस (एमएच २० बीएल २९५७) फुकेरी येथून बांद्याच्या दिशेने येत होती. पानवळ येथे सदर बस आली असता समोरून भरधाव वेगात येणाऱ्या धाराशिव – पणजी बस (एएच १४ एलबी ७४९) ची समोरून जोरदार धडक बसली. बस चालकाने ब्रेक लावत बसवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला. मात्र, धाराशिव बस वेगात असल्याने धडक बसल्यानंतर फूकेरी बसला सुमारे १०० मीटर पर्यंत फरफटत नेले. यावेळी दोन्ही बसमधील प्रवाशांनी आक्रोश केला. ही धडक इतकी मोठी की बसचा समोरील भाग पूर्णपणे तुटून पडला. बसमधील प्रवासी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दुखापती झाल्या.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी ओर अशांना बाहेर काढून मिळेल त्या वाहनाने उपचारासाठी बांदा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले.



वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन सारंग यांनी उपचार केले. पैकी ४ जखमींना अधिक उपचारासाठी सावंतवाडी उप जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. उर्वरित जखमीना प्राथमिक उपचार करून दुपारी घरी पाठविण्यात आले.

अपघातानंतर दोन्ही एसटी बसेस रस्त्याच्या मध्यभागी अडकून पडल्याने दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, आठवडा बाजारासाठी येणारे लोक, शिक्षक अडकून पडले होते. दरम्यान, अपघातानंतर स्थानिकांनी मदतकार्य करून एका बाजूने साईडपट्टीवर दगड टाकत दुचाकी व नागरिकांना जाण्याचा मार्ग मोकळा करून दिला.

अपघाताची माहिती मिळताच बांदा पोलीस कर्मचारी दत्ताराम पालकर, सीताकांत नाईक, तेली, विलास भोगले यांनी घटनास्थळी जात पंचनामा केला. दरम्यान, एसटी अधिकारीही दाखल होत अपघाताची माहिती घेतली. तब्बल दोन तासानंतर अपघातातील एक एसटी बाजूला करून एकेरी वाहतूक सुरु करण्यात आली.

अपघातात पुनाजी आईर (२५,,रा. फुकेरी), रमेश आईर (६२, रा. फुकेरी), सुरेखा भरत आईर (५०, रा. फुकेरी), इंदुमती भरत आईर (७७,रा. फुकेरी), अर्चना अरुण डिंगणेकर (४०, रा. पडवे माजगाव), प्रकाश शांताराम राऊळ (६०, रा. पडवे माजगाव), ज्ञानेश्वर मानू गवस (६०, रा. झोळंबे), भक्ती विजय देसाई (१७, रा. झोळंबे), रेश्मा रमेश आईर (३०,रा. फुकेरी), रामचंद्र रावजी गवस (७२, रा. फुकेरी), यशवंत लक्ष्मण आईर (७५, तांबोळी), कमल विद्याधर ओगले, अनिल अंनत कदम, मोहन लाडू गवस, तद्मी बाळासाहेब कुंभार, बाळासाहेब गणपत कुंभार, उर्मिता श्रीकांत कुंभार हे प्रवासी जखमी झाले. तसेच बसचालक प्रल्हाद नारायण कांबळी, वाहक संदीप पांडुरंग परिट (कोल्हापूर आगार) तसेच फुकेरी बस चालक अर्जुन धुरी व वाहक आनंद लांबर (सावंतवाडी आगार) हे जखमी झालेत.

दरम्यान, एसटी प्रशासनाकडून प्रत्येक जखमी प्रवाशाला पाचशे रुपयांची मदत देण्यात आली. यावर मनसे तालुकाध्यक्ष मिलिंद सावंत यांनी आक्षेप घेतला. एसटी प्रशासनाची मदत तुटपुंजी असून जखमीना जास्तीत जास्त मदत द्या, अशी मागणी केली. यावर एसटी प्रशासनाचे अधिकारी नार्वेकर यांनी जर जखमी प्रवाशाने खाजगी रुग्णालयात उपचार करून त्याची बीले सादर केली तर प्रशासनाकडून सदर बिलांची रक्कम अदा करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

## महिला आरोग्यासाठी योग सत्राचे यशस्वी आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**सांखळी दि.१ :** जागतिक योग दिनानिमित्त युवा चेतना संघ, केरी–सत्तरी यांच्या वतीने श्री सातेरी देवी प्रसन्न मंदिर,घोटेली नं. २, केरी–सत्तरी येथे महिलांसाठी विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले.या सत्रात वयोगट ३० ते ७० वयोगटातील महिला सहभागी झाल्या.

व्यासपीठावर योग प्रशिक्षक सुर्यकांत गावस व आपा म्हालकर,युवा चेतना संघाच्या सदस्य निर्जला पर्येकर व इतर सदस्य उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली.योग प्रशिक्षक सुर्यकांत गावस व आपा म्हालकर योग प्रशिक्षण दिले.त्यांनी महिलांना विविध योगासने,प्राणायाम आणि ध्यानाच्या तंत्राचे मार्गदर्शन केले. सुर्यकांत गावस यांनी योगाचे जीवनातील महत्त्व यावर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचा समारोप संस्कृत श्लोकाने केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय गावस यांनी केले.प्रांजल गावस हिने आभार मानले.





**CHANGE OF NAME**

I **LOYAL LAUDISLAV RODRIGUES**, r/o H.NO.C-17/96/73 B.NO.4/F, S-1 MODELS COMPLEX ST, PAUL AMARAL TALEIGAO CARANZALEM PANAJI TISWADI GOA.403002 like to change my name from **LOYAL NELSON RODRIGUES** to **LOYAL LAUDISLAV RODRIGUES** Hereafter in all my dealings and documents I will be known by the name **LOYAL LAUDISLAV RODRIGUES.**

**CHANGE IN NAME**

I, **Albano Jose de Menezes** r/o H.No. 319, Santarbhat P.O Piedade, Divar would like to correct my name from Alban Joseph Menezes to Albano Jose de Menezes hereafter in all my dealings and documents, I will be known by my new name **Albano Jose de Menezes**

**गोवा सरकार**
**जलस्रोत खाते**
**कार्यकारी अभियंता कार्यालय**
**काम विभाग–११**
**रावणफोंड, नावेली–गोवा**

**क्र. डब्ल्यूआरडी/डब्ल्यूडी–११/पीबी/एफ–२४/२०२५–२६/५००**
**दि. २६/०६/२०२५**

**निविदा सूचना**
**निविदा सूचना**
**(फक्त ई–निविदा प्रणालीने)**

कार्यकारी अभियंता, काम विभाग–११, जलस्रोत खाते, रावणफोंड, सासष्टी, गोवा यांनी वरील संदर्भाची निविदा सूचना प्रसिद्ध केली आहे. तपशीलवार निविदा सूचना **https://eprocure.goa.gov.in** या संकेतस्थळावर पाहता येईल.
डीआय/एडीव्हीटी/७६०/२०२५


## हरमल भटवाडी रस्ता धोकादाय वाहने चालवावी कशी ?





■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १ :** मांद्रे मतदारसंघातील रस्त्यांची स्थिती दननीय बनली असून १५ जुलै पूर्वी या रस्त्यांची दुरुस्ती झाली नाही ,तर यापूर्वीच कॉंग्रेसचे नेते देवेंद्र प्रभुदेसाई आणि समर्थकांनी रास्ता रोको करण्याचा इशारा दिलेला आहे. यावर आता सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री तथा मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत हे या रस्त्यावर कशा प्रकारचे लक्ष देतात ?याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहेत.

दरम्यान हरमल पंचायत क्षेत्रातील भटवाडी येथील मुख्य रस्ता, हा रस्ता आहे की खड्ड्यातून रस्ता तयार केला? अशी स्थिती निर्माण झालेली आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूने गटार व्यवस्थाही कोलमडून पडल्यामुळे रस्त्यावरील खड्डे दिवसेंदिवस वाढत आहे. या रस्त्यावरून वाहने चालवताना कशा प्रकारची कसरत करावी लागते. हे चित्र प्रत्यक्ष या रस्त्यावर भेट दिल्यानंतर दिसून येते. सरकारने आणि सार्वजनिक बांधकाम खाते रस्ता विभागाने या रस्त्याकडे अजून पर्यंत लक्ष का दिले नाही? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

सार्वजनिक बांधकाम खाते हे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांच्याकडे असून त्यांनी आजपर्यंत या रस्त्याच्या डागडूजी कडे सूचना का केल्या नाही ?असा सवाल येथील नागरिक उपस्थित करत आहेत.

पावसाचे पाणी या रस्त्यावर भरून राहिल्यानंतर कुठे खड्डा आहे हे दुचाकी वाहन चालकांना कळत नाही.वाहने चालवताना अपघातही कधी कधी घडत असतात. याकडे आता तातडीने लक्ष देऊन या रस्त्याची डागडूजी करावी अशी मागणी केली जात आहे.

दरम्यान कॉंग्रेसचे नेते देवेंद्र प्रभु देसाई आणि त्यांच्या समर्थकाने मांद्रे मतदार संघातील जे रस्ते धोकामय बनलेले आहेत, ते जर १५ जुलै पूर्वी दुरुस्ती केली नाही. तर रास्ता रोको करण्याचा इशारा दिल्यानंतर पार्से येथील रस्त्याची थोड्या प्रमाणात डागडूझी एक जुलै पासून सुरू करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे हरमल भटवाडी या रस्त्याची ही डागबुजी करावी. अशी मागणी केली जात आहे. शिवाय कोरगाव भटवाडी याही ठिकाणी रस्ता मोठ्या प्रमाणात जे भूमिगत वीज केबल आणि जलवाहिनी घातल्या होत्या, त्यावेळी व्यवस्थित दुरुस्ती न केल्यामुळे या रस्त्यांना खड्डे पडले, रस्ते खचत गेल्याचे चित्र दिसून येत आहे.


**पाहिजेत**

Wanted Counter sales boys and sales girls staying in and around Panjim, Pls. Contact Tel. Nos. 9011937381

**व्यवसाय**

Shop for rent at Panjim, Jairam Complex, Mala, Panjim.
Pls. Contact Tel. Nos. 9011937381